# सिद्धयोग साधनेचा शुभारंभ

## डेव्हिड कॅट्झ् यांच्याद्वारे व्याख्यान

*वर्ष २०२३च्या नववर्ष दिवसाच्या निमित्ताने आयोजित, मधुर सरप्राइझ्मध्ये या वर्षासाठी गुरुमाई चिद्विलासानंद यांचा नववर्ष संदेश प्राप्त करण्यासाठी सिद्धयोगी श्री मुक्तानंद आश्रमात एकत्र झाले होते. या सत्संगात, श्री. डेव्हिड कॅट्झ् यांनी एक व्याख्यान दिले जे इथे देण्यात येत आहे :*

नूतन वर्षाभिनंदन!

तुम्हा सर्वांना, जे अनंततेचे मोजमाप करण्यात निपुण आहेत, नूतन वर्षाच्या शुभेच्छा!

आणि आता, मी समस्त सृष्टीला नूतन वर्षाच्या शुभेच्छा देऊ इच्छितो, जी काळाच्या बंधनात नाही! सातही महाद्वीपांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा! वर आकाशाला नूतन वर्षाच्या शुभेच्छा! खाली धरतीला नूतन वर्षाच्या शुभेच्छा! सगळ्या तत्त्वांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा!
समस्त दशदिशांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा!

त्या सर्वांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा, ज्यांना नववर्षाच्या *नाविन्याचा आनंद* साजरा करण्याचा विशेषाधिकार प्राप्त आहे. त्या सर्वांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा जे संघर्ष करत राहिले आहेत—कारण तुम्ही नूतन वर्षाच्या नाविन्याचा आनंद प्राप्त करण्यास आणि अनुभवण्यास पात्र आहात.

मी तुम्हाला पुन्हा एकदा नववर्षाच्या शुभेच्छा देऊ इच्छितो, अगदी त्याच पद्धतीने, ज्या पद्धतीने आपण सिद्धयोग मार्गावर असे म्हणत देतो, “सद्‌गुरुनाथ महाराज की जय!”

आजच्या या सकाळी आपण सर्वजण वर्ष २०२३साठी गुरुमाई चिद्विलासानंद यांचा नववर्ष संदेश प्राप्त करण्यासाठी सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये एकत्र आलो आहोत. आपण श्रीगुरुमाईंचे मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठी इथे आलो आहोत. आपल्यापैकी जे साधक अनेक वर्षांपासून सिद्धयोग मार्गावर आहेत, त्यांच्यासाठी हे मार्गदर्शन आहे की, आपण आपली साधना कशी सुरू ठेवावी. आणि नवीन साधकांसाठी, हे मार्गदर्शन आहे की, या मार्गावरील वाटचालीचा प्रारंभ त्यांनी कशा प्रकारे करावा.

आपण मधुर सरप्राइझ् २०२३मध्ये सहभागी होत आहोत! जय गुरुमाई!

माझे नाव डेव्हिड कॅट्झ् आहे आणि माझ्यासाठी ही अतिशय सन्मानाची व आनंदाची गोष्ट आहे की, श्रीगुरुमाईंसमवेत होणाऱ्या आजच्या या सत्संगात मी सूत्रधार आणि वक्ता म्हणून सेवा करतो आहे.

तुम्हाला जे प्राप्त होणार आहे, ते प्रत्यक्षात तुम्हाला प्राप्त होण्यापूर्वी, त्याच्या महत्त्वाविषयी काही ज्ञान असले तर नेहमी मदत होते. म्हणून, आजच्या माझ्या या व्याख्यानात, मी तुम्हाला सांगणार आहे की, मी माझ्या सिद्धयोग साधनेतून काय शिकलो आहे. मी सिद्धयोग मार्गावर गेली एकोणचाळीस वर्षे आहे, ज्या मार्गाचा परिचय मला करवून दिला होता माझी अत्यंत सुंदर आणि प्रतिभाशालीनी पत्नी कश्मीरीने, जी या अनेक वर्षांदरम्यान माझी साधना-सहचरीदेखील आहे. माझ्या अनेक वर्षांच्या साधनेद्वारे मला जे ज्ञान प्राप्त झाले आहे, त्या ज्ञानामुळे मला हे समजण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे की, वर्षभरासाठी दिले गेलेले श्रीगुरुमाईंचे संदेश कशा प्रकारे ग्रहण करावेत आणि त्यांचा अभ्यास कशा प्रकारे करावा.

संपूर्ण जगात—सर्व महाद्वीप, संस्कृती आणि परंपरा यांमध्ये—लोक मोठ्या अपेक्षेने, आदराने व उत्सव साजरा करत नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसाचे स्वागत करतात. नव्याने काही सुरुवात करण्याची, आपला दृष्टिकोण पुन्हा व्यवस्थित करण्याची आणि नव्या उद्देशासह व उत्साहाने भविष्याच्या दिशेने अग्रेसर होण्याची एक संधी म्हणून नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसाचा अंगीकार केला जातो.

सिद्धयोग मार्गावर, १ जानेवारी हा खरोखरच एक अद्भुत व शक्तिपूरित समय असतो. हे आपले परम सौभाग्य आहे की, या दिवशी आपल्याला श्रीगुरुमाईंकडून नववर्षासाठी संदेश प्राप्त होतो. सार्वभौमिक सिद्धयोग संघम्‌मध्ये, हा आपल्या सर्वांना सामूहिक रूपाने आपल्या आध्यात्मिक विकासात प्रगती करण्याची एक सुसंधी प्रदान करतो. आपल्या सामूहिक संकल्पामध्ये आणि तीव्र उत्कंठेमध्ये प्रचंड सामर्थ्य असते, की आपण साधनेत एकत्रितपणे खरी प्रगती करू शकू.

नववर्षासाठी संदेश देण्याच्या या परंपरेचा प्रारंभ श्रीगुरुमाईंनी वर्ष १९९१मध्ये केला होता. श्रीगुरुमाईंच्या करुणेची ही एक उत्कृष्ट अभिव्यक्ती आहे आणि ही परंपरा सिद्धयोग मार्गाचा एक आधारस्तंभ बनली आहे.

याचा अजून थोडा शोध घेऊ या. आणि हा प्रश्न विचारून सुरुवात करू या, "सिद्धयोग मार्ग म्हणजे काय?"

सिद्धयोग मार्ग म्हणजे परमात्म्याला जाणण्याच्या आपल्या तीव्र उत्कंठेला श्रीगुरूंनी दिलेला प्रतिसाद होय. श्रीगुरूंनी आपल्याला दर्शवलेला मार्ग हा अनुशासनाचा, अध्ययनाचा आणि चिंतनमननाचा मार्ग

आहे. आणि, आपल्याला प्रत्यक्ष रूपाने श्रीगुरूंचे सान्निध्य प्राप्त असल्यामुळे हा श्रद्धा-भक्तीचा आणि सेवेचा मार्ग आहे. श्रीगुरूंच्या शिकवणींचे खऱ्या अर्थाने जतन करण्यासाठी हे महत्त्वाचे आहे की, शिष्य या नात्याने आपण या शिकवणींचा अभ्यास करावा, त्या आत्मसात कराव्यात आणि त्यांना कार्यान्वित करावे.

गुरू-शिष्य संबंधाच्या माध्यमातून घडून येणाऱ्या या अद्‍भुत किमयेचा आरंभ होतो शक्तिपात दीक्षेने. शक्तिपात दीक्षा अर्थात गुरुकृपेच्या थेट संप्रेषणाद्वारे शिष्यामधील कुंडलिनी शक्तीची जागृती. ही दीक्षा परमोच्च असते.

का? कारण जागृत कुंडलिनीची शक्ती आपण केलेल्या त्या प्रयत्नांना आधार देते, जे आपण मनाच्या व इंद्रियांच्या शुद्धीकरणासाठी व परमात्म्याशी ऐक्य अनुभवण्यासाठी करतो. शक्तिपात दीक्षा केवळ सिद्धगुरूच प्रदान करू शकतात, अर्थात ते सद्‍गुरू जे परम आत्म्याच्या अनुभूतीमध्ये शाश्वत रूपाने अवस्थित आहेत.

शक्तिपातानंतर, श्रीगुरू जागृत कुंडलिनी शक्तीच्या विकासाला निरंतर मार्गदर्शन करत राहतात. हे मार्गदर्शन सिद्धयोग मार्गाच्या शिकवणींच्या व अभ्यासांच्या माध्यमातून केले जाते आणि याच संदर्भाने आपणास श्रीगुरुमाईंनी वर्षासाठी दिलेल्या संदेशाचे महत्त्व समजू शकते.

जसे श्रीगुरुमाई म्हणतात :

> माझी इच्छा आहे की, जेव्हा तुम्ही संदेश ऐकाल,
> तेव्हा तुम्ही हे जाणून घ्यावे की, हा संदेश म्हणजे संपूर्ण वर्षभरासाठी एक दीक्षा आहे.
> या संदेशाची शक्ती, तुमची समज आणि तुमचे प्रयत्न यांना कृपेने अनुप्राणित करेल.[१]

तुम्ही यावर काही क्षण चिंतनमनन करावे अशी माझी इच्छा आहे.

श्रीगुरुमाईंकडून हे जाणून घेऊन मला खूप आनंद झाला व प्रेरणा मिळाली : की, त्यांचा संदेश हा संपूर्ण वर्षासाठी एक ‘दीक्षा’ आहे.

आता, आपण ‘दीक्षा’ या शब्दाकडे अधिक लक्षपूर्वक पाहू या.

‘दीक्षा’ या शब्दासाठी इंग्रजी शब्द आहे initiation [इनिशिएशन] जो लॅटिन भाषेचा मूळ शब्द initiatus [इनिशिएटस]पासून आला आहे ज्याचा अर्थ आहे, ‘एखाद्या गोष्टीचा प्रारंभ करण्याची कृती

किंवा प्रक्रिया.' अनेक आध्यात्मिक परंपरांमध्ये, दीक्षा प्राप्तीला एक प्रकारचे शुद्धीकरण मानले जाते. आणि एखादी गोष्ट शुद्ध करण्याचा अर्थ आहे, तिला पवित्र करणे किंवा तिला पवित्र घोषित करणे.

या अंतर्दृष्टींसह, आपण त्या गोष्टीचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो जी आज आपण श्रीगुरुमाईंकडून प्राप्त करणार आहोत. आणि हे सिद्धयोग साधनेच्या मार्गावर एक पवित्र नवीन सुरुवात करण्यापेक्षा कमी नाही, जी गुरुकृपेने अनुप्राणित आहे.

कधीकधी मी विचार करतो : गुरुमाईंनी संपूर्ण वर्षासाठी संदेश देण्याची निवड का केली असावी? गुरुमाई तर सतत शिकवणी प्रदान करत असतात. गुरुमाई जेव्हा व्यक्तिगतरित्या आपल्याशी बोलतात, तेव्हा त्या त्यांच्या शिकवणी प्रदान करत असतात. गुरुमाई जेव्हा लिहितात, तेव्हा त्या त्यांच्या शिकवणी प्रदान करत असतात. गुरुमाई जेव्हा प्रवचन देतात, गुरुमाई जेव्हा आपल्या स्वप्नांमध्ये येतात, गुरुमाई जेव्हा आपल्या हृदयात आपल्याशी संवाद साधतात, उदाहरणार्थ जेव्हा आपण श्रीगुरुगीतेचा पाठ करत असतो किंवा जेव्हा आपण भुयारी मार्गावर चालत असतो—अशा सर्व प्रसंगी गुरुमाई त्यांच्या शिकवणी प्रदान करत असतात. श्रीगुरुमाईंनी पूर्णच्या पूर्ण पुस्तके लिहिली आहेत, त्यांनी अनेक काव्यसंग्रहांची रचना केली आहे, ज्यांमध्ये त्या त्यांच्या शिकवणी प्रदान करत आहेत. आपल्याला जर त्यांच्या शिकवणी शिकायच्या असतील, आपल्याला जर त्या शिकवणींना आपल्या ज्ञानकोशाचा व जीवनाच्या आपल्या अनुभवाचा भाग बनवायचा असेल, आपल्याला जर त्यांना आपल्या साधनेचे अभिन्न अंग बनवायचे असेल, तर त्या शिकवणी आपल्यासाठी सहज उपलब्ध आहेत.

हे सर्व जर असे असेल, तर असे *का आहे* की, श्रीगुरुमाईंनी संपूर्ण वर्षासाठी एक संदेश प्रदान केला आहे?

माझ्या मनात एक विचार येतो : असे केवळ या कारणामुळे असावे की. . . श्रीगुरुमाई *खरोखरच* आपल्याला चांगल्या प्रकारे जाणतात.

जेव्हा एखाद्या गोष्टीला एक विशेष स्थान दिले जाते, जसे ते नववर्ष संदेशाला दिले जाते—जेव्हा त्याचा उद्देश आणि त्याचे महत्त्व आपल्याला समजावून सांगितले जाते, तेव्हा त्याचे पालन करण्यासाठी आपण अधिक तत्परतेने प्रयत्न करतो. आपल्याला जे प्राप्त होते आहे, त्याचे मूल्य ओळखण्याचा, त्याचा आदर करण्याचा मार्ग आपण शोधतो. आपल्याला आपल्या अंतरी 'वचनबद्धता' हा सद्गुणही दिसतो—आज्ञापालन करण्यासाठीची वचनबद्धता, नववर्ष संदेश आत्मसात करण्यासाठीची वचनबद्धता.

आणि याविषयी की, श्रीगुरुमाई आपल्या सर्वांना चांगल्या प्रकारे जाणतात, मी आणखी एका गोष्टीवर विचार केला आहे, जी मी तुम्हाला सांगू इच्छितो, की गुरुमाई दरवर्षी एक संदेश का प्रदान करतात. ज्या अनेक लोकांशी मी व्यक्तिगतरित्या बोललो आहे आणि इतर अनेक लोक ज्यांनी सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर व्यक्त केले आहे, त्या सर्व लोकांनी सांगितले की, गुरुमाईंचा संदेश त्यांना अगदी योग्य वेळी प्राप्त झाला आहे. गुरुमाईंच्या मुखातून निघालेले ते शब्द म्हणजे *अगदी* तेच शब्द होते, जे ऐकण्याची त्यांना आवश्यकता होती.

त्याबरोबरच, मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की, श्रीगुरुमाईंचा नववर्ष संदेश समयातीत आहे. प्रत्येक संदेश एक मंत्र आहे, प्रत्येक संदेश एक सूत्र आहे—तुम्ही युगानुयुगे त्याच्या अर्थाचे अन्वेषण करू शकता, त्याचे प्रज्ञान इतके अनंत आहे.

आता, श्रीगुरुमाई हा निर्णय केव्हा आणि कसा घेतात की, एखाद्या विशिष्ट वर्षी त्यांना तोच विशिष्ट संदेश प्रदान करायचा आहे—मला माहीत नाही! हे माहीत नसण्यामध्येच मला खूप आनंद जाणवतो.

मी जे सांगू *शकतो,* ते हे आहे की, श्रीगुरुमाईंच्या संदेशाचा आपल्या जीवनावर जो प्रभाव होतो, तो अगाध आहे, त्याचा थांग लागणार नाही. तो साधकांच्या हृदयात प्रवेश करतो, मग त्या साधकांची आस्था कोणत्याही धर्मावर असो, ते कोणत्याही संस्कृतीचे अथवा वयाचे असोत. श्रीगुरुमाईंचा संदेश एक सार्वभौमिक उपदेश आहे.

आता मी तुम्हाला एका साधिकेचा अनुभव सांगू इच्छितो, तो ऐका; त्यांचा हा अनुभव वर्ष २०१४साठीच्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाशी निगडित आहे. या महिला जवळपास साठ वर्षे कॅथलिक चर्चच्या डॉमिनिकन परंपरेतील नन [ख्रिश्चन तपस्विनी] होत्या. वर्ष २०१५च्या ऑगस्ट महिन्यामध्ये त्या श्री मुक्तानंद आश्रमात आल्या होत्या. श्री मुक्तानंद आश्रमात येऊन गुरुमाईंचे दर्शन झाल्यावर त्या कृतज्ञतेने इतक्या भारावून गेल्या, की त्या केवळ श्रीगुरुमाईंनी दिलेल्या त्यांच्या आवडत्या संदेशाप्रति आपली कृतज्ञता व्यक्त करून आभार प्रकट करू शकल्या. त्या म्हणाल्या :

> तुमच्या अंतरी जे इतके मौल्यवान आहे त्याविषयी तुम्ही कसे बोलावे? मला श्रीगुरुमाईंचा हा संदेश अतिशय आवडतो—"निःशब्द नाद, निरंजन शान्ति के मण्डल में उदय और विलय होता है।" मी जेव्हा तो वाचला, तेव्हा मी तो एका फलकावर लिहून तो फलक कॉन्व्हेंटच्या [ख्रिश्चन मठ] एका प्रवेशद्वारावर लावला जेणेकरून हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना तो दिसेल.

> आपल्यापैकी प्रत्येकाच्या अंतरी खोलवर काहीतरी आहे. काहीतरी आहे—त्याला आपण नीलबिंदू म्हणू शकतो अथवा भगवंताची उपस्थिती म्हणू शकतो. गुरुमाईंच्या त्या संदेशाने माझ्या अंतरी स्थित मौनाच्या एका गहन स्थानात मला स्पर्श केला. तुम्हाला हे जाणून घ्यायचे आहे का, की भगवंत काय आहे? तो तुम्ही आहात, तो मी आहे, तो निसर्गात भगवंताची उपस्थिती आहे. गुरुमाई, तुम्ही आज मला जे दिले आहे, त्याकरता मी तुम्हाला जितके धन्यवाद देईन, तितके कमीच आहेत.

एस. वाय. डी. ए. फाउंडेशनची एक स्टाफ सदस्या जी त्या ननची मैत्रीण आहे, तिच्याकडून मी ऐकले की, त्या नन सतत सांगतच राहिल्या आहेत की, वर्ष २०१४साठीच्या गुरुमाईंच्या संदेशाचा त्यांच्यावर किती खोलवर प्रभाव झाला आहे. त्या संदेशाने त्यांच्या अंतरी त्यांचे प्रभू, येशू ख्रिस्त यांची उपस्थिती जागृत केली आहे.

त्या ननला जो अनुभव आला—आणि हा विचार की, श्रीगुरूंच्या शिकवणी आणि विशेषतः श्रीगुरुमाईंचा नववर्ष संदेश आपल्या अंतरी एकापाठोपाठ एक जागृती घडवून आणू शकतो—तो आपल्याला भारताच्या ऋषिमुनींच्या महान प्रज्ञानाचे स्मरण करवून देतो. अनेकानेक प्राचीन शास्त्रग्रंथांमध्ये आणि तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांमध्ये हे प्रज्ञान लिपिबद्ध केले गेले आहे.

मला नेहमीच असे आढळून आले आहे की, भारतीय शास्त्रग्रंथ हे ज्ञानाचा एक अथांग स्रोत आहेत, आणि ते सिद्धयोग मार्गावर मला आलेल्या अनुभवांना स्पष्टपणे समजण्यास तसेच गुरुमाईंच्या शिकवणींविषयीच्या माझ्या समजूतीवर प्रकाश टाकण्यास मला मदत करतात. आणि आता, अनेक वर्षांपासून ‘मुक्तबोध भारतीय प्राच्य विद्या संशोधन संस्था’चा अध्यक्ष आणि बोर्ड-प्रमुख असण्याच्या भूमिकेत मला माझी ही समज आणखी अधिक विस्तृत करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले आहे, की हा प्रज्ञान-स्रोत किती सखोल आहे. वर्ष १९९७मध्ये गुरुमाईंनी या संस्थेची स्थापना केली जेणेकरून भारताच्या प्राचीन शास्त्रग्रंथांचे परिरक्षण करण्यास साहाय्य व्हावे. या संस्थेच्या कार्याद्वारे, वर्तमानात तीन हजारांपेक्षाही अधिक मूळ हस्तलिखित ग्रंथांचे डिजिटल रूपात जतन केले गेले आहे.

कठोपनिषद्‌मध्ये उल्लेख आहे :

> कवयो वदन्ति
> ऋषिगण म्हणतात . . .

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत
"उठा, जागे व्हा, महापुरुषांकडे जा आणि त्यांच्याकडून ज्ञान प्राप्त करा."[२]

माझ्या आत्मीय सह-साधकांनो, जागृत राहणे काय असते, याचे महत्त्व आपण सर्वांनी जाणावे. आणि मग, आपण *एकमेकांना* जागे होण्यासाठी प्रेरित करू या. जेव्हाजेव्हा आपल्याला दिसून येईल की, आपण वा आपले साथीदार झोपू लागले आहेत, तेव्हातेव्हा आपण श्रीगुरूंच्या शिकवणींच्या—श्रीगुरुमाईंच्या संदेशाच्या—प्रकाशाने एकमेकांचा मार्ग प्रकाशित करू या.

ज्या सत्संगात श्रीगुरुमाई त्यांचा नववर्ष संदेश प्रदान करतात, त्या सत्संगाला त्यांनी वर्ष २००८मध्ये नाव दिले 'मधुर सरप्राइझ्.' श्रीगुरुमाईंनी समजावून सांगितले की, हे एक 'सरप्राइझ्' आहे कारण आपल्याला त्या वर्षासाठी त्यांचा संदेश कोणत्याही स्वरूपात प्राप्त होऊ शकतो.

आणि त्यांचा संदेश *कोणत्याही स्वरूपात* जरी असला, तरी मी सर्वांना या गोष्टीचे स्मरण करवून देऊ इच्छितो की, संपूर्ण वर्षासाठी संदेशाचा महान उपहार हा आहे की, आपल्याकडे भरपूर वेळ असतो, जेणेकरून आपण त्याचे अध्ययन करू शकू आणि त्यामध्ये निहित असलेल्या शिकवणी आपल्या अभ्यासात कार्यान्वित करू शकू; जेणेकरून आपल्याला त्याच्या दिशेने त्याच पद्धतीने अग्रेसर होता येईल, ज्या प्रकारे आपण एखाद्या प्रिझम्पाशी [त्रिकोणाकार लोलक] पोहोचून शोध घेऊ की, तो किती भिन्नभिन्न रूपांमध्ये स्वतःचा प्रकाश आपल्या जीवनात प्रतिबिंबित व परावर्तित करतो.

मी सांगू शकणार नाही की, वर्ष १९९६साठी गुरुमाईंचा संदेश, *"उत्साहाने भरून जा आणि प्रभूचा महिमा गात राहा,"* हा कितीतरी वेळा, आव्हानात्मक परिस्थितींमध्ये, माझ्यासाठी जीवनरक्षक नौका ठरला आहे. आणि नुकत्याच संपलेल्या, २०२२च्या वर्षामध्ये गुरुमाईंच्या संदेशाचा फक्त एकच शब्द, "ऐका," हाच पुरेसा होता, जो मला स्मरण करवून देत होता की, मी थांबावे, एक दीर्घ श्वास घ्यावा आणि कोणतेही पाऊल उचलण्याआधी हे समजून घ्यावे की, त्या क्षणी काय आवश्यक आहे.

निश्चितच, आपल्या सर्वांना हा शब्द माहीत आहे, "ऐका." मी पस्तीस वर्षे न्यूरोसायंटिस्ट [मज्जासंस्थेचा वैज्ञानिक] आणि मेडिकल स्कूलचा प्रोफेसर म्हणून काम केले आहे. आणि निश्चितच मी ते सर्व काही केले जेणेकरून मी हे सुनिश्चित करू शकेन, की माझ्या विद्यार्थ्यांनी माझे म्हणणे नीट ऐकावे!

तथापि, मी जेव्हा माझ्या श्रीगुरूंकडून हा शब्द ऐकतो, "ऐका," तेव्हा तो माझ्या मनात एका वेगळ्याच प्रकारे प्रतिध्वनित होतो. तो श्रीगुरूंच्या संकल्पाच्या स्पंदासह प्रतिध्वनित होतो, ज्याला मी

श्रीगुरुमाईंच्या वर्ष २०२२साठी संदेशाच्या रूपात ग्रहण केले आहे. तो त्या स्तरावर स्पंदित होतो, जो माझ्या मनाच्या स्तरापलीकडे आहे. तो शब्द मला माझ्या अंतरी त्या स्थानी घेऊन जातो, जिथे मी निःसंशयपणे जाणतो की, "मी तो आहे जो मी आहे."

आपण *अतिशय* भाग्यवान आहोत की, आपण सिद्धयोग मार्गावर आहोत. आणि त्या सर्व नवीन साधकांना मी सांगू इच्छितो, जे मधुर सरप्राइझ्मध्ये प्रथमच भाग घेणार आहेत आणि श्रीगुरुमाईंचा संदेश प्राप्त करणार आहेत, जो तुमचे जीवन रूपांतरित करेल—माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही हे जाणून घ्यावे की, तुम्ही एका पावन तीर्थयात्रेचा शुभारंभ करणार आहात. तुम्ही सिद्धयोग साधनेचा शुभारंभ करणार आहात.

© २०२३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

[१] गुरुमाई चिद्विलासानंद, हृदयाची साधना [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१०], पृ १०२.

[२] कठोपनिषदावर आधारित १.३.१४; इंग्रजी भाषांतर © एस. वाय. डी. ए. फाउंडेशन.